शनिपेठ पोलीस स्टेशन,जळगाव
दिनांक :- 30 / 11 / 2025

## प्रेस नोट

## शनिपेठ पोलीस .स्टेशन यांची उत्कृष्ट कामगीरी

दिनांक 04 /11/2025 रोजी शनिपेठ पोलीस स्टेशन येथे CCTNS CR NO- 239/2025 BNS - 2023 चे कलम 305(A)प्रमाणे चोरीचा गुन्हा दाखल असुन सदरचा गुन्हा हा दिनांक 27/10/2025 रोजी 17.00 ते 17.30 वा.चे दरम्यान RC बाफना ज्वेलर्स ,सुभाष चौक व भंगाळे गोल्ड, राजकमल टॉकीज ,जळगाव येथे घडला असुन यातील फिर्यादी गणेश राजाराम काळे, रा.अयोध्या नगर,जळगाव व्यवसाय- मॅनेजर RC बाफना ज्वेलर्स ,जळगाव.हे असुन त्यांनी दिलेल्या फिर्याद वरुन दाखल आहे. सदर गुन्हा हा एक अनोळखी महीला हीने हात चालाखी करुन तीन सोन्यच्या अंगठ्या घेवुन नकली अंगठ्या ठेवुन चोरी करत असतांना CCTV फुटेज मध्ये निष्पन्न झाले आहे.

सदर अनोळखी महीला हीने जळगाव शहरात अश्याच प्रकारे जिल्हापेठ पोलीस स्टेशन हद्दीतील पु.ना.गाळगीळ ॲण्ड सन्स रिंग रोड,जळगाव येथे सोन्याच्या अंगठ्या बदलवुन नकली अंगठ्या ठेवुन गुन्हा केला असुन सदर घटनासंदर्भात दिनांक 01/11/2025 रोजी CCTNS CR NO- 305/2025 अन्वये गुन्हा दाखल आहे.

सदर अनोळखी महीला हीने अशाचप्रकारे छत्रपती संभाजी नगर,जिन्सी पोलीस स्टेशन यांचे हद्दीतील RC बाफना ज्वेलर्स या दुकानात अशाच स्वरुपाचा गुन्हा केल्याने जिन्सी पोलीस स्टेशन येथे दिनांक 11/11/2025 रोजी CCTNS CR NO- 308/2025 प्रमाणे गुन्हा नोंद आहे.

वरील गुन्ह्यांमध्ये एकाच प्रकारे सोन्यचे अंगठ्या चोरी झाल्या असुन सदर अनोळखी महीला हीनेच चोरी केल्याचे CCTV फुटेजमध्ये निष्पन्न झाल्याने सदर संदर्भात तपासकामी मा.पोलीस अधीक्षक सो.जळगाव श्री.महेश्वर रेड्डी, मा.अपर पोलीस अधीक्षक सो.श्री.अशोख नखाते. मा.उपविभागिय पोलीस अधिकारी सो.जळगाव उपविभाग. श्री.नितीन गणापुरे, पोलीस निरीक्षक श्रीम.कावेरी कमलाकर,शनिपेठ पोलीस स्टेशन,जळगाव यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि साजीद मन्सुरी ,पोउपनि/ योगेश ढीकले यांनी कामकाज पाहुन सदर गुन्हयाचे तपासी अंमलदार पोहेकॉ/2834 प्रदिप रमेश नन्नवरे , त्यांचे सोबत तपास पथक मपोहेकॉ/2908 वैषाली पावरा, पोकॉ/1546 निलेश घुगे , यांना तपासकामी बरेली उत्तर प्रदेश येथे पाठवुन सदर महीला नामे लकी शर्मा उर्फ लकी शिवशक्ती पाठक हीस ताब्यात घेवुन तिचेकडुन वरील नमुद तिन्ही गुन्ह्यातील मुद्देमाल ( सोन्याच्य अंगठ्या ) 61.67 ग्रॅम 6 नग एकुण रक्कम 6,60,000/- रु. असे हस्तगत करण्यात आलेले आहे. सदर गुन्ह्यामध्ये नेत्रम विभाग ,जळगाव येथील पोकॉ /3357 पंकज खडसे ,पोकॉ/ 485 मुबारक तडवी , पोकॉ/ 1299 कुंदसिंग बयस व तांत्रीक विश्लेषण कामी पोकॉ/ 1978 मिलींद जाधव, पोकॉ/2305 गौरव पाटील यांचे सहकार्य लाभले असुन, सदर महीला ही शनिपेठ पोलीस स्टेशन कडील गुन्हयात अटक असुन पुढील तपास वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली चालु आहे.


शनिपेठ पोलीस स्टेशन जळगाव
गुन्हा रजि. क्र. २३९/२०२५ कलम ३०५(अ) बी.एन. एस. २०२३
गुन्हयातील जप्त मुददेमाल
आर.सी. बाफणा, जळगाव येथून चोरी केलेला मुददेमाल
भंगाळे गोल्ड, जळगाव येथून चोरी केलेला मुददेमाल
पु. ना. गाडगीळ ज्वेलर्स, जळगाव येथून चोरी केलेला मुददेमाल
आर.सी. बाफणा, छ. संभाजी नगर येथून चोरी केलेला मुददेमाल

